# पुणे महानगरपालिका
## * स्थायी समिती *
## कार्यपत्रिका क्रमांक ४१

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. ८/१/२०१९** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **महात्मा जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

### घनकचरा व्यवस्थापन आढावा

**विषय क्र. २०४०**

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाविषयी पंधरा क्षेत्रिय कार्यालयाकडील दि.१/१२/२०१८ ते दि.२३/१२/२०१८ अखेर पर्यंत पाठविलेला अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.सह.महा.आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) यांचे जा.क्र.घकव्यका/४९६९ दि. २७/१२/२०१८ चे पत्र.

### माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. २०४१**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ यांच्या अखत्यारीतील दि. १ ते १५ डिसेंबर २०१८ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे कार्यादेश देण्यात आलेल्या कामाची माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पक्र.५/९१३ दि.२९/१२/२०१८ चे पत्र.

### सर्वात कमी रकमेचे टेंडर्स

**विषय क्र. २०४२**

पर्वती जलकेंद्राकडील फिल्टर हाऊस व पंप हाऊस येथील विविध कामांसाठी सेवक पुरविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.श्री.स्वामी गोविंदा कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४८,७८,०४९=८० पेक्षा ५% जास्त तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रु.५१,२१,९५२=२९ चे काम आवश्यक ती रक्कम वर्गीकरणाने स्पीलओव्हरने उपलब्ध करुन घेऊन दि.१९/५/२०१८ पासून काम करुन घेण्यासाठी पश्चात मान्यता मिळणेस तसेच त्यांचेबरोबर करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ई) यांचे जा.क्र. मआ/पापु/९५६ दि.१/१/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. २०४३**

पुणे म.न.पा.चे परिमंडळ क्र. ४ व ५ मधील जुन्या ट्रॅफिक सिग्नलची वार्षिक देखभाल दुरुस्ती (पादचारी सिग्नलसह) सन २०१८-१९ करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.न्युक्लिऑनिक्स ट्रॅफिक सोल्युशन प्रा.लि. यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२७,२०,०००/- पेक्षा २०.२१% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु.३२,६९,७१२/- उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करून घेणेस व त्यांच्याशी करारनामा करणेस आणि त्यांनी केलेल्या कामापोटी बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/विदयुत/९७३ दि. २/१/२०१९ चे पत्र.

### एकच रकमेचे टेंडर्स

**विषय क्र. २०४४**

वृक्ष पुनर्रोपण व अन्य कामासाठी **JCB 4DX** या प्रकारचे २ नग जेसीबी Government E-Market Portal (GeM) वर ऑनलाईन निविदा (online bidding) खरेदी करणे कामी निविदा मागविली असता निविदाधारक मे.जेसीबी इंडिया लि. यांची एकच निविदा आली असल्याने त्यांचेकडून सदरचे काम करुन घेणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/९७५ दि.२/१/२०१९ चे पत्र.

१. वृक्ष पुनर्रोपण व अन्य कामासाठी **JCB 4DX** या प्रकारचे जेसीबी मे.जेसीबी इंडिया लि. या वाहन उत्पादक कंपनीकडून १ नग जेसीबी करीता रक्कम रु.२६,८२,९९९/- याप्रमाणे २ नग जेसीबी करीता रक्कम रु.५३,६५,९९८/- पर्यंत जीएसटी व सर्वकरांसह त्यांचे दर पत्रकातील सर्व अटी स्विकारून Government E-Market Portal (GeM) द्वारे Performance Bank Guarantee व अनामत रक्कम १% घेऊन करारनामा न करता खरेदी करणेस.

२. वृक्ष पुनर्रोपण व अन्य कामासाठी **JCB 4DX** या प्रकारचे जेसीबी मे.जेसीबी इंडिया लि. या वाहन उत्पादक कंपनीकडून १ नग जेसीबीकरीता रक्कम रु.२६,८२,९९९/- याप्रमाणे २ नग जेसीबी करीता रक्कम रु.५३,६५,९९८/- पर्यंत जीएसटी व सर्वकरांसह त्यांचे दर पत्रकातील सर्व अटी स्विकारून Government E-Market Portal (GeM) द्वारे Performance Bank Guarantee व अनामत रक्कम १% घेऊन करारनामा न करता खरेदी कामी होणारे देयक मे.जेसीबी इंडिया लि. या वाहन उत्पादक कंपनीचे नावे ऑनलाईन पध्दतीने ईसीएस/आरटीजीएस याद्वारे आदा करणेस,

३. वृक्ष पुनर्रोपण व अन्य कामासाठी **JCB 4DX** या प्रकारचे जेसीबी खरेदी कामी येणारा खर्च खालील अंदाजपत्रकीय अर्थशीर्षकामधून करणेस,

सन २०१८-१९
एफ ई २० पी ११५
१०.वृक्ष संरक्षण व संवर्धन प्राधिकारी निधीतून (अ‍ॅथॉरिटी फंडातून) करावयाचा खर्च
वृक्ष पुनर्रोपण व अन्य कामासाठी २ जेसीबी व २ टिपर खरेदी करणे
मान्य रक्कम रूपये- १,१५,००,०००/-

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. २०४५**

महाराष्ट्र महानगरपालिका प्रांतिक अधिनियम कलम २०८ प्रमाणे करणेत येत असलेल्या कारवाईबाबत अतिक्रमण विभागामार्फत मा.मुख्य सभा ठराव क्रमांक ७११ दिनांक २०/१२/२०१७ अन्वये रिमुव्हल चार्जेस आकारणेची कार्यवाही करणेत येत असून महानगरपालिका हद्दीतील अवजड वाहने, हलकी वाहने व इतर वाहने निर्बंध असलेल्या रस्त्यांवर व इतर सर्व रस्त्यांवर निर्बंध असलेल्या ठिक़ाणी पार्किंग/उभी केल्याबद्द्ल वाहने न उचलता जागेवर दंड आकारणीची कार्यवाही वाहतुक पोलिस विभागामार्फत खालील तक्त्यातील नमूद केलेल्या दरानुसार करणेत येत असून सदर बाब निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुअ(प्र)/८२५ दि.१५/१२/२०१८ चे पत्र.

| अ.क्रं. | वाहन प्रकार | तपशील | विशेष आकार |
|---|---|---|---|
| १ | अवजड वाहने | निर्बंध असलेल्या रस्त्यांवर व इतर सर्व रस्त्यांवर , निर्बंध असलेल्या ठिक़ाणी वाहन पार्क केल्याबद्द्ल | र.रू.५,०००/-प्रत्येकी |
| २ | हलकी वाहने | सर्व रस्त्यांवरील ( १० टनापर्यंत वहन क्षमता असलेली ) निर्बंध असलेल्या ठिकाणी वाहन पार्क केल्याबद्द्ल | र.रू.२,५००/- प्रत्येकी |
| ३ | कार,जीप इ. वाहने | सर्व रस्त्यांवरील निर्बंध असलेल्या ठिकाणी वाहन पार्क केल्याबद्द्ल | र.रू.२,०००/- प्रत्येकी |
| ४ | सहा व तीन आसनी रिक्षा आणि तीन चाकी टेम्पो | बंदी असेल्या रस्त्यांवर व निर्बंध असलेल्या ठिकाणी वाहन संचलन व पार्क केलेबद्द्ल. | र.रू.१,५००/-प्रत्येकी |
| | | इतर सर्व रस्त्यांवर निर्बध असलेल्या ठिकाणी वाहन पार्क केलेबद्द्ल. | र.रू.१,०००/- प्रत्येकी |
| ५ | इतर यंत्रसामुग्री/रोड रोलर | सर्व रस्त्यांवरील निर्बंध असलेल्या ठिकाणी वाहन पार्क केलेबद्द्ल | र.रू.३,०००/- प्रत्येकी |
| ६ | स्वयंचलित दुचाकी वाहने | सर्व रस्त्यांवरील निर्बंध असलेल्या ठिकाणी वाहन पार्क केलेबद्द्ल. | र.रू.१,०००/- प्रत्येकी |

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि.२४/१२/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २०४६**

पुणे पेठ कोथरुड स.नं. १४७, हि.नं.२+१अ व २/ब+३+४+५/अ येथील PMPML & ST साठी आरक्षित असलेली ९ आर व १८ आर क्षेत्र जमीन संपादन करणेची कार्यवाही सुरु करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शअ/६४८ दि.३०/१०/२०१८ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि.२४/१२/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २०४७**

मनपा भवन येथे विस्तारीत इमारत बांधणे व पुणे मनपा मिळकतीमध्ये क्षेत्रिय कार्यालय/प्रशासकीय इमारतीचे विस्तारीकरण करणेकरीता खालीलप्रमाणे वर्गीकरणाने तरतूद र.रू. १२.५० कोटी उपलब्ध करून देणेस मा. स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भवन/६४९ दि.३०/१०/२०१८ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-२०१९ चे अंदाजपत्रक,<br>समाज विकास विभाग,<br>१) पुणे शहरात लाईट हाऊस प्रकल्प सुरू करणे, (FE14D136), पान क्र.१४२.<br>२) पुणे शहरातील रस्त्यावरील मुलांकरीता विविध उपक्रम राबविणे, (FE14C208) पान क्र. १४०.<br>३) आरोग्य विभाग, कैलास स्मशानभुमी येथील बायोमेडिकल वेस्ट प्लँट समोरील ट्रान्सफॉर्मर स्थलांतर करणे व इतर सुधारणा कामे करणे व विद्युत दाहिनी बसविणे (RE17F236), पान क्र. ६०. | ३०० लाख<br>७५० लाख<br>२०० लाख | ----<br>----<br>---- |
| नविन सुचविलेले काम<br>मनपा भवन येथे विस्तारीत इमारत बांधणे व पुणे मनपा मिळकतीमध्ये क्षेत्रिय कार्यालय/प्रशासकीय इमारतीचे विस्तारीकरण करणे | ---- | १२५० लाख |

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि.२४/१२/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २०४८**

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात मंजूर अंदाजपत्रकीय तरतुदीचे वर्गीकरणाला मंजुरी देणे ही बाब मा.स्थायी समितीचे अखत्यारीतील बाब असल्याने तसेच प्रशासनाकडे दि.१५.१२.२०१८ नंतर प्राप्त होणाऱ्या वर्गीकरण मंजुरीचे ठरावांवर कार्यवाही करणे प्रशासनास शक्य होणार नसल्यामुळे सदरची बाब मा.स्थायी समितीचे निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त बाब मा.स्थायी समितीचे व त्यांचेमार्फत सर्व माननीय पदाधिकारी व सभासदांचे निदर्शानास आणून देणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/७८२ दि.४/१२/२०१८ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि.२४/१२/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २०४९**

अलंकार थिएटरजवळ रेल्वे ओव्हरब्रिज बांधणे या कामास सन २०१८-१९ साठी उपलब्ध अंदाजपत्रकीय तरतूद अपुरी असल्याने वर्गीकरणाद्वारे या कामासाठी र.रुपये ४६० लक्ष इतकी आर्थिक तरतूद उपलब्ध करून देणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुअ(प्र)/७७८ दि.४/१२/२०१८ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-२०१९ चे अंदाजपत्रक, मुख्य अभियंता (प्रकल्प), शहरातील नदी सुधारणा कामे करणे, तदनुषंगिक कामे करणे.(CE20D219/L2-) मधील अ.क्र.३ नदी सुधारणा प्रकल्प राबविणे (PPP/कर्ज/अनुदान/इतर वित्तीय माध्यमातून नदी व नदीकाठ विकसित करणे/सुधारणा करणे) | ४,६०,००,००० | ---- |
| सुचविलेले काम<br>मुख्य अभियंता (प्रकल्प), शहरातील विविध ठिकाणी पूल बांधणे, उड्डाणपूल बांधणे, भुयारी मार्ग करणे या कामाअंतर्गत बजेट हेड (CE20D170/L1-) मधील अ.क्र.५ अलंकार थिएटर जवळ रेल्वे ओव्हरब्रीज बांधणे | ---- | ४,६०,००,००० |

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि.२४/१२/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २०५०**

मा.योगेश ससाणे व मा.ॲड्.भैय्यासाहेब जाधव यांचे दि. २४/१२/२०१८ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या पुणे शहरातील सर्व जलतरण तलावामध्ये पुणे शहरातील पत्रकार बंधु-भगिनींना सवलतीच्या दरामध्ये प्रवेश देण्यात यावा. तश्या प्रकारच्या सुचना सर्व जलतरण तलाव चालविणाऱ्या ठेकेदार/संस्था यांना देण्यात यावे.

वर्तमानपत्र हे लोकशाहीचा तीसरा खांब असून पत्रकार हे जनतेसाठी २४/७ उपलब्ध असतात. त्यामुळे त्यांच्याकडून कळत न कळत त्यांच्या तब्येतीकडे दुर्लक्ष होत असते. त्यामुळे सदर सुविधा पुणे महानगरपालिकेतर्फे त्यांना दिल्यास त्यांना त्यांची तब्येतीची काळजी घेण्यास मदत होईल.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२/१/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २०५१**

पुणे मनपाच्या हद्दीतील वर्गीकरण केलेला घनकचरा वाहतूकीसाठी भाडेतत्वावर ६ क्यु.बी. ते ९ क्यु.बी. क्षमतेचे टिपर पुरविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.बालाजी अर्थमुव्हर्स अ‍ॅन्ड लॅन्ड डेव्हलपर्स, पुणे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२४,९९,०००/- पेक्षा पुर्वगणनपत्रकावर १५% जादा) असल्याने त्यांचेकडून र.रु.२८,७३,८५०/- पर्यंत भाडेतत्वावर घेणे व त्याकामी त्यांचेबरोबर करारनामा करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/८७८ दि.२०/१२/२०१८ चे पत्र.

१) मे.बालाजी अर्थमुव्हर्स अ‍ॅन्ड लॅन्ड डेव्हलपर्स, पुणे यांचेकडून त्यांचे टेंडरदराने (पुर्वगणनपत्रकावर १५% जादा) एकूण रक्कम रु. २८,७३,८५०/- (अक्षरी रक्कम रुपये अठ्ठावीस लाख त्र्याहत्तर हजार आठशे पन्नास फक्त) पर्यत करुन घेणेस व त्याकामी त्यांचे बरोबर करारनामा करणेस,

२) मे. बालाजी अर्थमुव्हर्स अ‍ॅन्ड लॅन्ड डेव्हलपर्स, पुणे यांचेकडून पुणे मनपाच्या हद्दीतील वर्गीकरण केलेला घनकचरा वाहतूकीसाठी भाडेतत्वावर ६ क्यु.बी. ते ९ क्यु.बी. क्षमतेचे टिपर पुरविणे हे काम दि.१७/११/२०१८ पासून सुरु करण्यात आलेले असल्याने प्रकरणी मान्यता मिळेपर्यतचे कामाकरीता पश्च्यात मान्यता मिळणेस,

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२/१/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २०५२**

पुणे महानगरपालिकेकडून जाहिरात फलक परवानगी व नूतनीकरण दिलेल्या सर्व जाहिरात फलक धारकांकडून परवानगीच्या दिनांकापासून ते आजपर्यंत व्यावसायिक दराने कर आकारणी करण्याबाबत मा.सौ.चाँदबी नदाफ, मा.सौ.राजश्री काळे व मा.सौ.वैशाली मराठे यांचे दि.१६/८/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ९६१ दि. २८/८/२०१८ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/७८६ दि.६/१२/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२/१/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २०५३**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.प्रमोद ओसवाल व मा.सौ.चाँदबी नदाफ यांचे दि.१३/३/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २३९९ दि. २०/३/२०१८ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६३ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२/१/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २०५४**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.बाळा ओसवाल व मा.योगेश ससाणे यांचे दि.२७/११/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १४२३ दि. २८/११/२०१७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६४ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२/१/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २०५५**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.अविनाश बागवे व मा.मुक्तारी अलगुडे यांचे दि.१५/९/२०१५ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ११४७ दि. १५/९/२०१५ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६५ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२/१/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २०५६**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.योगेश ससाणे व मा.बाळा ओसवाल यांचे दि.१४/२/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २१९३ दि. २०/२/२०१८ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६६ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२/१/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २०५७**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.अविनाश बागवे, मा.सौ.वैशाली मराठे, मा.अभिजित कदम, मा.सौ.सुनिता गलांडे यांचे दि. १२/३/२०१३ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २६५४ दि. १९/३/२०१३ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६७ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२/१/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २०५८**

इमारतीचे साईड फ्रंट मार्जिन जाहिरात फलकांबाबत मा.अविनाश बागवे व मा.प्रिया गदादे यांचे दि.१३/११/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १३१३ दि. २१/११/२०१७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६८ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला फेरअभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२/१/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २०५९**

पुणे महानगर परिवहन महामंडळाचे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील संचलन तूट बाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/२२३३ दि. १७/१२/२०१८ ने केलेला लेखापरिक्षण अहवाल विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२/१/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २०६०**

पुणे मनपाच्या हद्दीमध्ये जागोजागी पडलेला कचरा गोळा करून हायवा २५१६ या प्रकारचे १५ क्यु. मी. क्षमतेच्या टिपर वाहनांनी वाहतुक करणे कामी टेंडर्स मागविली असता मे.बालाजी अर्थमुव्हर्स अॅन्ड लॅन्ड डेव्हलपर्स, पुणे यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु.९९,९९,०००/- पेक्षा पुर्वगणनपत्रकावर १५% जादा) असल्याने त्यांचेकडून रक्कम रु.१,१४,९८,८५०/- (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी चौदा लाख अठ्याण्णव हजार आठशे पन्नास फक्त) पर्यत भाडेतत्वावर घेणे व त्याकामी त्यांचेबरोबर करारानामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/८५२ दि. १७/१२/२०१८ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२/१/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

## संकिर्ण

**विषय क्र. २०६१**

पाणी पुरवठा व मलनि:साण विभागाकडील सन २०१८-१९ चे 'क' अंदाजपत्रकतील महसूली भांडवली कामातील शिल्लक रक्कमेतून पाणी पुरवठा भांडवली कामे व महसूली कामे करणेसाठी र.रुपये ३०००.०० लक्ष खालीलप्रमाणे वर्गीकरणाने उपलब्ध करुन देणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पापु/९१९ दि.३१/१२/२०१८ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, मुख्य अभियंता, पाणी पुरवठा व मलनि:साण विभाग, **ZE16C103/PR3-2**, पुणे शहरात तंत्रशुध्द पध्दतीने पाणीपुरवठा करण्याची योजना (२४x७) अंतर्गत भूसंपादनासाठी | ३०००.०० लाख | ---- |
| सुचविलेले काम<br>पाणी पुरवठा विभाग, पुणे महानगरपालिका<br>१) **ZE16A103/P1-125+**, पर्वती जलकेंद्र येथे नविन ५०० एमएल डी क्षमतेचे जलशुध्दी करण केंद्र बांधणे<br>२) **ZE16A103/P1-126+**, खडकवासला येथे नविन जॅकवेल बांधणे. पुणे शहरातील नविन बंद पाईपलाईन टाकणे (खडकवासला-पर्वती-लष्कर)<br>३) **XE12A107**, ७-अ.पंपिंग वीज खर्च<br>४) **XE12N106**, ६.पंपिंग वीज खर्च | ----<br>----<br>----<br>---- | ८००.०० लाख<br>७००.०० लाख<br>८००.०० लाख<br>७००.०० लाख |

विषय क्र. २०६२

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात सुरु असलेले विविध प्रकल्पाकरिता माहे मार्च २०१९ अखेर कमी पडणारी रक्कम पथ विभागाकडील इतर कामामधील शिल्लक राहणाऱ्या र.रुपये ९२५ लक्ष खालीलप्रमाणे वर्गीकरणाने उपलब्ध करुन देणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/९३८ दि.१/१/२०१९ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, मुख्य अभियंता (पथ) | | |
| १) **CE20A1263/A16-16,** पाटील इस्टेट जंक्शन ते हॅरिज ब्रीज पुणे मुंबई रस्ता पर्यंत- रस्ता रुंदीकरण करणे व BRT मार्ग विकसित करणे व इतर तदनुषंगिक कामे करणे | ५०० लाख | ---- |
| २) **CE20A1263/A16-14,** सिमला ऑफिस चौक ते राजीव गांधी पुल, औंध, गणेश खिंड रस्ता, येथे रस्ता रुंदीकरण करणे व BRT मार्ग विकसित करणे व इतर तदनुषंगिक कामे करणे | २००लाख | ---- |
| ३) **CE20E101/F1-13,** लोहगाव वाघोली रस्ता मनपा हद्दीपर्यंत डी.पी. प्रमाणे २४ मी.रुंदीप्रमाणे ताब्यात घेवून दोन्ही बाजूस पावसाळी लाईन टाकून रस्ता डांबरीकरण करणे | ५० लाख | ---- |
| ४) **CE20A1249/A6-50,** मगरपट्टा ३० मी.डी.पी. रस्ता विकसित करणे | ७५ लाख | ---- |
| ५) **CE20A102/SA2-1727,** वैकुंठ मेहता इन्स्टिट्यूट मधून युनिव्हर्सिटी सर्कल ते मागील गेटपर्यंतचा रस्ता करणे | १०० लाख | ---- |
| सुचविलेले काम<br>मुख्य अभियंता (पथ) | | |
| १) **CE20A1263/A16-11,** सातारा रोड BRT मार्ग विकसीत करणे. | ---- | २५०लाख |
| २) **CE20A1262/A9-283,** कात्रज कोंढवा रस्ता राजस सोसा. ते खडीमशिन चौक ते पिसोळी गाव पुणे मनपा हद्द रस्ता ८४ मी.रुंद डी.पी.रस्त्याचे काम करणे | ---- | २०० लाख |
| ३) **CE20A103/A13-112,** नगर रस्ता - शादुल बाबा चौक ते खराडी बायपास फुटपाथ विषयक कामे करणे | ---- | १५० लाख |
| ४) **CE20A102/SA2-911,** प्रभाग क्र. ३६ मधील बिबवेवाडी मुख्य रस्ता विकसित करणे | ---- | १५० लाख |
| ५) पुरु सोसायटी स.नं.२३५, २३६, २३९ लोहगाव येथील रस्ता विकसित करणे | ---- | १७५ लाख |

विषय क्र. २०६३

पुणे, कळस, सि.स.नं ३३६(पैकी), स.नं.११२ अ(पैकी), स.नं.११२ ब(पैकी) या मिळकतील ४५ मी.डी.पी रस्त्याने आरक्षित क्षेत्राची मा.स्थायी समिती ठराव क्र.१७४९, दि.०३/०१/२००६ च्या ठरावान्वये भूसंपादन कायद्यान्वये अथव तडजोडीने भूसंपादन करणेस दिलेल्या मान्यतेनुसार विशेष भूमि संपादन अधिकारी क्र.१६,पुणे यांचे कार्यालयामार्फत एलए-५३७ अन्वये चालू असलेली भुसंपादनाची कार्यवाही कायमस्वरुपी रद्द करणेस व त्याप्रमाणे मा.जिल्हाधिकारी(भूसंपादन शाखा)पुणे यांना व विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.१६ ,पुणे यांना भूसंपादन कार्यवाही कायमस्वरुपी रद्द करणेबाबतची अर्धशासकीय पत्र पाठविणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भूसंपादन/९६३ दि.२/१/२०१९ चे पत्र.

विषय क्र. २०६४

पुणे मनपा पथ विभागामार्फत राबविणेत येणाऱ्या निरनिराळया पुलांचे व रस्त्यांचे कामाकरीता तज्ञ सल्लागारांच्या पॅनेलमध्ये मे.स्वराज इंजिनिअरिंग कन्सल्टंसी यांचे नाव वर्ग (II) र.रुपये ५.०० ते २०.०० कोटीपर्यंत समाविष्ट करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/९७४ दि.२/१/२०१९ चे पत्र.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**